## नितीनकुमार हिंगोले उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, पुसद

क्रमांक/उविअ/भुसंअ/अका/कावी/ ९० /2017 दिनांक २३/ / /2017

**भुसंपादन प्रकरण क्रमांक-01/47/2015-2016 मौजा नांदगव्हाण ता.दिग्रस जिल्हा यवतमाळ**

**(भुसंपादन, पुर्नवसन व पुर्नवसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणी पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-2013)**

ज्या अर्थी, महाराष्ट्र शासनाने भुमीसंपादन, पुर्नवसन व पुर्नवसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणी पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-2013(2013 चा 30) याच्या कलम-3 च्या खंड-(इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकिय अधिसुचना, महसुल व वन विभाग क्रमाक/संकिर्ण-11/2014/प्र.क्रं.-77/अ-2,दिनांक 19 जानेवारी-2015,(यात यापुढे जिचा निर्देश*उक्त अधिसुचना* असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम-3 च्या खंड-(झेड ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्हयातील 500 हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी, हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समूचित शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणी ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समूचित शासन असलेल्या **यवतमाळ** जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या **अनुसूची एक** मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश *उक्त जमीन* असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त*सार्वजनिक प्रयोजन* असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तीची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या **अनुसूची दोनमध्ये** दिलेले आहे. आणी म्हणुन उक्त अधिनियमाच्या **कलम**-11 **च्या पोटनियम**-(1) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणी ज्याआर्थी प्रस्तावित भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे. यासोबत जोडलेलया **अनुसूची तीन** मध्ये दिलेली आहेत.

आणी ज्याआर्थी,सामाजिक परीणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या **अनुसूची चार** मध्ये दिलेला आहे,

आणी ज्याआर्थी, कलम-43 च्या पोट कलम-(1) अन्वये पुर्नवसन व पुर्नवसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या **अनुसूची पाच** मध्ये दिलेला आहे.

त्याआर्थी आता, असे घोषित करण्यात य त आहे की, उक्त अधिनियमाच्या **कलम**-11 **च्या पोटकलम**-4 अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल, त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाच्या कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परीस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सुट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लघंन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम-11च्या पोट कलम-(5) अनुसार जिल्हाधिकारी भुमीसंपादन,पुर्नवसन व पुर्नवसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (माहराष्ट्र) नियम-2014 (यात यापुढे ज्यांचा निर्देश *उक्त नियम* असा करण्यात आला आहे) यांच्या नियम-10 च्या उपनियम-(3) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भुमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणी ज्याआर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-3 च्या खंड-(छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी पुसद यास पदनिर्देशित करीत आहे.

पुढील पानावर...